ॐ

सर्वेभ्यो धर्मेभ्यो नमः ।

काव्य - १६०९

# सर्व-धर्म-प्रार्थना

संग्राहक :

**पंडित, नारायण वासुदेव तुंगार**

व्याख्याता - अशोक राजधर्म सांस्कृतिक मोफत व्याख्यानमाला, पुणें.

REFBK-0013477

REFBK-0013477

१९५३

किंमत एक रुपया

# निवेदन

यांत्रिक विकासाच्या योगानें जगांतील राष्ट्रें [illegible] जवळ जवळ आलेलीं आहेत. हा सुयोग या शतकांत प्राप्त झाला आहे हें एक राष्ट्रीय शुभ-लक्षण होय. पूर्वींच्या काळीं हा योग न आल्यानें सर्व राष्ट्रें एकमेकांपासून दुराव-लेलीं होतीं. भिन्नभिन्न धर्मांचीं, भिन्न भिन्न संस्कृतींचीं राष्ट्रें एकमेकांच्या चांगल्या तत्त्वांची देवाण-घेवाण करण्यापासून दुरावलेलीं होतीं. परंतु आतां तो संकुचित काळ पूर्ण बदललेला आहे. आतां जगांतील राष्ट्रें एकमेकांपासून संपूर्णपणें अलग अलग राहूं शकत नाहींत. अनेक गोष्टींनीं, अनेक प्रकारांनीं एकमेकांना उपयोगी पडण्याची प्रवृत्ति राष्ट्रांराष्ट्रांतून सारखी वाढत आहे. यावरून जग सुधारण्याच्या मार्गावर आहे हें सिद्ध होतें. दुसऱ्याच्या सुखदुःखांत नेहमी सहभागी होणें हाच खरा मानवता धर्म होय. माणसानें माणसाला दया दाखविणें, दुसरा आणि मी निराळा नाहीं 'हम एक है' जो आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यास समजतो हीच मानव धर्माची शिकवण आहे. मानवता धर्मानेंच व्यक्तीचा, समाजाचा व राष्ट्राचा उद्धार होईल ही गोष्ट सर्व राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांना पटली आहे. मानवताधर्माचे उपासक भारतीय प्राचीन ऋषी, धर्माचार्य, बुद्ध, महावीर, नानक येशू, पैगंबर, प्राचीन संत, तत्त्वज्ञ, राष्ट्रपुरुष, समाजसुधारक, सेवक हे होत. या सर्वांनीं विचार, उच्चार व आचार याद्वारें सर्वोद्धारक अशा मानवता धर्माचें उत्कृष्टपणें संरक्षण केलें. ती धर्मरक्षणाची परंपरा टिकविण्याचें काम आबाल-वृद्धांनीं नेहमीं केलें पाहिजे. मानवताधर्माची शिकवण प्रत्येक धर्माच्या प्रार्थनेंत आहे. आत्मशुद्धि, कर्मशुद्धि व जनशुद्धि, राष्ट्ररक्षण, सर्वांभूतीं दयाबुद्धि यासाठीं प्रत्येक लहानथोर माणसानें दररोज धर्मप्रार्थना म्हटली पाहिजे व त्या प्रार्थनेचा अर्थ जाणून घेऊन चिंतन केलें पाहिजे, वर्तन केलें पाहिजे. असें घडल्यास या उत्कृष्ट संस्कारांमुळें सर्व जग, सर्व राष्ट्रें एक विश्वकुटुंब आहे, एक मानव कुटुंब आहे, त्याचे आपण सभासद आहोंत, ही प्रवृत्ति माणसांत हळूंहळूं उत्पन्न होईल. वैदिक, जैन, बौद्ध, शीख, हे भारतीय धर्माचे लोक, तसेंच मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, ज्यू वगैरे जरी भिन्न धर्माचे, भिन्न संस्कृतीचे लोक असले तरी सर्वजण मानव म्हणून एकच आहेत. प्रत्येक धर्मामध्यें पोटभेदांच्या व पंथांच्या तीव्र भेदांच्या ऐक्याला बाधक, राष्ट्र-विनाशक, भीतिदायक, अशा मोठ्या भिंती कायम आहेत. त्या नष्ट केल्या पाहिजेत. या भिंतीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न संयुक्तराष्ट्रसंघ करीत आहे. तो प्रयत्न राज-नैतिक बैठकीवरून होत असला तरी मानवताधर्माला पोषक आहे. हल्लीं मंदिर, चर्च, मशीद, अग्यारी, या पवित्र देवमंदिरांतून त्या त्या धर्माचे लोक धर्माची प्रार्थना म्हणतात. तशीच प्रत्येक घरांतील स्त्रीपुरुष यथाशक्ति धर्म-प्रार्थना, ईश्वर-पूजन करीत आहेत. या सर्व धर्मांच्या प्रार्थनांचे दर्शन व्हावें व ईश्वर, बुद्ध, महावीर, येशू, अल्ला, या नामभेदानें सर्वव्यापी ईश्वराचें दर्शन सर्वांना होऊन प्रत्येकानें भारताच्या रक्षणासाठीं समर्थ व्हावें म्हणून श्री. अ. र. पटवर्धन, पिंपरी, यांच्या प्रोत्साहनानें जनतेच्या हातीं ही सर्व प्रार्थना अर्पण करतों.

दि. १४।२।१९६२

ना. वा. तुंगार

# अनुक्रमणिका


विषय — पृष्ठांक

१. सकाळीं मुखमार्जन केल्यानंतरची प्रार्थना — १–२
गणपति, सरस्वती, दत्त, विष्णु, वाल्मीकि, व्यास,
धन्वंतरि, नीतिशास्त्रकार, यांना वंदन.

२. भारतीय वैदिक प्रार्थना २ री–सार्थ. — ३–४
ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद
यातील ईश्वरप्रार्थना. गायत्रीमंत्र–सार्थ.

३. प्रार्थना ३ री — तैत्तिरीय आरण्यक, ऐतरेय ब्राह्मण — ५–६
यांतील प्रार्थना. प्रार्थना ४ थी मंत्रपुष्प. प्रार्थना ५ वी–शुभेच्छा.

४. वारकरी प्रार्थना ६ वी पसायदान — ७–८
प्रार्थना ७ वी–संतवंदन नाममहिमा–चोखोबा
पांडुरंगध्यान, ज्ञानोबा, तुकाराम, नामदेव, एकनाथ
नृसिंहनमन–एकनाथ. प्रार्थना ८ वी–रामदास प्रार्थना.

५. जैनधर्माची प्रार्थना–पंचनमोक्कार, चत्तारिमंगलं, — ९–११
चत्तारिसरणं, महव्वयउच्चारणा, जैन प्रार्थना २ री–सार्थ

६. बौद्ध धर्माची प्रार्थना–बुद्धवंदना, सरणत्तयं, — ११–१२
पंचसीलानि । सार्थ

७. शीखांची प्रार्थना — १३

८. पारशांची प्रार्थना–सार्थ — १३–१४

९. ख्रिस्ती धर्म प्रार्थना–इंग्रजी व मराठी अनुवाद — १५–१६

१०. मुसलमानांची प्रार्थना–सार्थ

११. संत–सुकन्या रबिया–हिची ईश्वरप्रार्थ[ना] — [illegible]–१७
रबियाची कहाणी. वन्दे मातरम् ।



काव्य
REFBK-0013477


---


[ सर्व हक्क प्रकाशकाधीन ]


हें पुस्तक डबल डेमी, ३६ पौंडी हिंदुस्थानांतील पांढऱ्या कागदावर छापलें आहे

## सर्वधर्मीयांचा देव एक आहे

सर्व धर्मांचा परमेश्वर तत्त्वतः एकच आहे. सर्व धर्मांच्या लोकांमध्ये सर्व धर्मांच्याबद्दल सहिष्णुता पाहिजे. एकमेकांत धर्मांजव्हाळा उत्पन्न झाला पाहिजे. एकमेकांनीं एकमेकांच्या धर्माची निंदा न करता चांगलीं तत्त्वें घेतलीं पाहिजेत. यासाठीं मी धर्मगुरूंना नेमणुका दिल्या आहेत —सम्राट् अशोक १२ वा शिलालेख

## संत माणिकप्रभु व गुलाम मुस्तफाखां संवाद

( साईबाबा अवतार कार्य, ले. अ. य. धोंड. पान ८२ )

गुलाम मुस्तफा—कोणत्याही मौलवीपेक्षां अरबी, फारसी भाषेचें ज्ञान माणिक प्रभूंना अधिक आहे. मुसलमान धर्माचें खरें रहस्य माणिक प्रभूंना समजलें आहे. महाराज, आपण जर मुसलमान असता तर मी आपला शिष्य झालों असतों. माणिक प्रभू हंसून म्हणाले, 'होय, मलाही मुसलमान व्हावेसें वाटतें परतु काय करू अल-आलमिन असें अल्लाला कुराणांत म्हटलें आहे. परमेश्वर विश्वाचा अधिपति आहे. रबअल मुसलमिन म्हणजे अल्ला-परमेश्वर फक्त मुसलमानांचाच आहे असें वचन कुराणांत नाहीं. म्हणून मुसलमान होऊन काय उपयोग ? तात्पर्य,

नरनारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करी देवा ॥

हा तुकाराम महाराजांचा उपदेश आचरणांत आणला पाहिजे.

## धर्मप्रार्थनांवरील सुविचार

**स्वामी विवेकानंद** — ( १ ) प्रार्थना आणि परमेश्वराची स्तुति यांचा परिपाक होतां होतां भक्ताला अखेरीस ध्यानावस्था प्राप्त होते. त्यानंतर इष्ट देवतेचें चिंतन आणि नामस्मरण यांतच त्याचें चित्त रमून जातें.

( विवेकानंद ग्रंथ–१०–१५८ )

वेगवेगळ्या धर्मांचे वेगवेगवेगळे धर्मग्रंथ आहेत. तथापि त्या सर्वांची ध्येयें तींच आहेत. विश्वव्यापी प्रेम, स्वातंत्र्य, पौरुष, त्याग, परोपकार, हे गुण अगीं कसे आणतां येतील हाच विचार सर्व धर्मांनीं केला आहे. परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् । ही धर्मांची व्याख्या अक्षरशः खरी आहे. सामर्थ्य आणि पौरुष हें पुण्य, दौर्बल्य आणि भेकडपणा हें पाप; वृत्तिस्वातंत्र्य हा सद्गुण, परावलंबीपणा हा दुर्गुण; परानुकंपा सद्गुण, परद्वेष हा दुर्गुण; आत्मश्रद्धा आणि परमेश्वराच्या ठिकाणी श्रद्धा हे पुण्य, साशंकवृत्ति हें पाप; समदृष्टि हें पुण्य, विषमताबुद्धि हें पाप. जगांत अनेक धर्मग्रंथ निर्माण झालेले आहेत पण पुण्य कसें संपादावें हें सांगणें हा त्या सर्व्या धर्मांचा एकच हेतु आहे. ( विवेकानंद समग्र ग्रंथ दशमखंड, पृष्ठें १६८-२६९. )

**राष्ट्रपिता महात्मा गांधी**–( १ ) सच पूछो तो शरीरके लीये भोजनकी उतनी आवश्यकता नही है जितनी आत्माके लिये ईश्वर प्रार्थना की है। ( २ ) ईश्वर प्रार्थनाने मेरी जीवनरक्षा की है। यदि मेरे जीवनमें ईश्वर प्रार्थनाने स्फूर्ति प्रवाहित न की होती तो मैं कभी का पागल हो गया होता. ( ३ ) दुनिया के तीन महान् उपदेशक बुद्ध. ईसा और मोहम्मद ऐसा अकाट्य प्रमाण छोड गये हैं कि उन्हे प्रार्थनासेही ज्ञानज्योति मिली थी और उसके बिना वे जीवित नहीं रह सकते थे।

**संत विनोबाजी**—भगवत्प्रार्थना हेंच सर्वधर्मसार आहे. दुःखितांची सेवा आणि मौन ही एकच प्रार्थनेची सर्वमान्य रीत आणि सर्वमान्य भाषा होऊ शकेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८३८ ........ वि: ........ वक्ता
क्रमांक ....१५८०८........ नों. दि: ........ १५-२

श्री संत माणिक प्रभू





# शुभकामना



नामदार मारोतराव सांबशिव कन्नमवार, मुख्यमंत्री, महाराष्ट्रराज्य
सचिवालय, मुंबई ३२.


दिनांक १८ एप्रिल १९६३

पुण्यांतील सुप्रसिद्ध विद्वान् ग्रंथकार, शिक्षक, पंडित नारायण वासुदेव तुंगार, यांच्या " सर्व-धर्म-प्रार्थना " या सचित्र पुस्तकाचें आज प्रकाशन करीत असतां मला फार मोठा आनंद होत आहे. याचें मुख्य कारण असें कीं भिन्न भिन्न धर्मांचे कोट्यवधि लोक भारतांत राहात आहेत. त्यांना एकमेकांच्या धर्मप्रार्थनांची कल्पना नसते म्हणून इतर धर्मांबद्दल त्यांच्या मनांत नेहमीं संकुचित भावना असते. ती दूर होण्यासाठीं सर्व धर्मांतील प्रार्थना पं. तुंगार यांनीं या पुस्तकामध्यें देवनागरी लिपींत छापून, त्यांचा अर्थ दिला आहे व धर्मसंस्थापकांचे उत्तम फोटो छापले आहेत. मूळ प्रार्थना व त्यांचा अर्थ वाचला असतां " मानवता धर्मानें सर्व मानव एक आहेत. " नेहमीं एकमेकांनीं सत्त्वगुणसंपन्न होऊन शरीर, वाणी, मन, यांनीं शुद्ध राहून परोपकारी बनावें व आत्मशुद्धि, कर्मशुद्धि, जनशुद्धि, साधावी हा अमौलिक बोध मनावर बिंबतो; ह्याच्या प्रचारासाठीं हें पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे. धर्मसंस्थापकांच्या दर्शनानें मानवता धर्माचें पालन करणें हाच प्रत्येक मानवाचा खरा जीवनहेतु आहे, ह्या बोधाचा संस्कार मनावर नेहमीं घडतो. तो घडविण्याचें पवित्र, श्रेष्ठतम कार्य पं. तुंगार, ह्या पुस्तकाच्या द्वारें व सर्वधर्मावरील प्रार्थनांच्या व्याख्यानांच्या द्वारें करीत आहेत, या त्यांच्या " निःस्वार्थ बहुमोल राष्ट्रसेवेला " माझ्या नेहमीं शुभकामना आहेत.

**मा. सां. कन्नमवार**



भगवान् गोपाळकृष्ण



भगवान महावीर

ॐ नमो बुद्धाय ।



भगवान् गौतमबुद्ध.

## येशु ख्रिस्त



" तुम्ही आपल्या शत्रूवरसुद्धां प्रेम करा. कोणाचा द्वेष करूं नका. जो तुम्हांस शाप देईल त्याचें तुम्ही हित करा. असें केल्यानेंच प्रभु प्रसन्न होतो.


तुम्ही तुमचें सत्कार्य गुप्त ठेवा. आपल्या उजव्या हातानें दिलेलें दान डाव्या हाताला समजूं देऊं नका. "

—येशूचें पर्वतावरील प्रवचन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३५३४४ वि. काव्य
१५०९ १५-४-५४




भगवान् जरतुष्ट




भगवान् गुरुनानक



स्वामी विवेकानंद



मक्का : मुसलमानांचे पवित्र ठिकाण

# सर्व-धर्म-प्रार्थना

## भारतीय वैदिकांची प्रार्थना

### प्रार्थना १ ली

### सकाळीं मुखमार्जन केल्यानंतरची प्रार्थना

चक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥ १ ॥

गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन् ।
पंचैतानि स्मरेन्नित्यं वेदवाणी प्रवर्तते ॥ २ ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ३ ॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि ॥ ४ ॥

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ॥
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥ ५ ॥

कवीन्दुं नौमि वाल्मीकिं यस्य रामायणीं कथाम् ।
चन्द्रिकामिव चिन्वन्ति चकोरा इव साधवः ॥ ६ ॥

श्रवणाञ्जलिपुटपेयं विरचितवान् भारताख्यममृतं यः ।
तमहमरागमकृष्णं कृष्णद्वैपायनं वन्दे ॥ ७ ॥

शङ्करं शङ्कराचार्यं केशवं बादरायणम् ।
सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥ ८ ॥

नमामि धन्वन्तरिमादिदेवं सुरासुरैर्वन्दितपादपद्मम् ।
लोके जरारुग्-भयमृत्युनाशं दातारमीशं विविधौषधीनाम् ॥ ९ ॥

मनवे वाचस्पतये शुक्राय पराशराय ससुताय ।
चाणक्याय च विदुषे नमोऽस्तु नयशास्त्रकर्तृभ्यः ॥ १० ॥

यं शैवाः समुपासते शिव इति, ब्रह्मेति वेदान्तिनो ।
बौद्धा बुद्ध इति, प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ॥
अर्हन्नित्यथ जैनशासनरताः, कर्मेति मीमांसकाः ।
सोऽयं वो विदधातु वाञ्छितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥ ११ ॥

## प्रार्थना २ री

हरिः ॐ (ओम्) सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै । ॐ (ओम्) शान्तिः शान्तिः शान्तिः । नारायणोपनिषत् ।

आम्हां गुरुशिष्यांच्या जवळ परमात्मा एकाच वेळीं येवो; आम्हां गुरुशिष्यांना परमात्मा एकाच वेळीं अन्नादिक देऊन रक्षण करो; ब्रह्मविद्येच्या व्याख्यानाविषयीं आम्हीं उभयतां बरोबरच बळ लावूं; आम्हीं उभयतां (गुरुशिष्य) वर्चस्वी होऊं, आम्ही केलेलें अध्ययन तेजस्वी असो; आम्हा उभयतांचें अध्ययन फल देणारें होवो; ब्रह्मविद्या शिकण्याच्या संबंधानें शिष्याकडून किंवा गुरूकडून बेसावधपणानें घडणाऱ्या अपराधापासून जो द्वेष उत्पन्न होतो, तो आम्ही उभयतां न करो. ॐ (ओम्) ह्या प्रणवानें सांगितलेल्या परमात्म्याकडून शांति असो, शांति असो, शांति असो.

तमीशा॑नं॒ जग॑तस्त॒स्थुष॒स्पतिं॑ धियं जि॒न्व-
मव॑से हूमहे व॒यम् ॥ पू॒षा नो॒ यथा॒ वेद॑-
सा॒मस॑द्वृ॒धे र॑क्षि॒ता पा॒युरद॑ब्धः स्व॒स्तये॑ ॥ १ ॥

ऋ० १।६।१५।५

अनुक्रम ........................ दि: ........
क्रमांक ........................ वौ दि: ........

हे परमात्मन्! तूं ( ईशानम् ) सर्व सृष्टीचा स्वामी, ( तस्थुषः ) स्थावर व ( जगतः ) जंगम पदार्थमात्रांचा ( पतिम् ) रक्षक व पालक, (धियं जिन्वम्) विद्यामय विज्ञानरूपी बुद्धीला प्रकाशित करणारा आहेस, ( तम् ) त्या तुला ( नः ) आमचें ( अवसे ) रक्षण व्हावें म्हणून ( वयम् ) आम्ही ( हूमहे ) प्रार्थितों, तुला प्रेमानें हाक मारतों. हे ईशा, ज्या रीतीनें आमची उन्नति होईल त्या रीतीनें तूं ( पूषा ) आमचें पोषण करणारा, ( वेदसामसव्दृधे ) विद्यादि धनांची वृद्धि करून ( रक्षिता ) रक्षण करणारा, ( पायुः ) पालक व ( अदब्धः ) सर्वदा आळस सोडून ( स्वस्तये ) आमचें कल्याण करणारा हो. तात्पर्य, हे सर्वशक्तिमान्! आम्हाला या अवनतीच्या दुःखांतून मुक्त कर व विद्या, ज्ञान इत्यादिकांची आमच्यांत लवकर वृद्धि होईल असें कर.

**यदन्ति यच्च दूरके भयं विन्दति मामिह ॥**
**पवमान वि तज्जहि ॥** ऋ० ७।२।१७।२१ ॥ २ ॥

( पवमान ) हे शुद्ध व पूजनीय परमेश्वर! ( इह ) या संसारामध्यें दूर व समीप भागीं जें भय ( माम् ) मला (विन्दति) होत आहे ( तत् ) त्याचा ( विजहि ) नाश कर व मला सुखी कर.

**यस्मान्न जातः परो अन्यो अस्ति य**
**आविवेश भुवनानि विश्वा । प्रजापतिः**
**प्रजया सꣳरराणस्त्रीणि ज्योतीꣳषि सचते**
**स षोडशी** ॥ ३ ॥ यजुर्वेद ८।३६ ॥

( यस्मात् ) ज्या परमेश्वराहून मोठा ( परः ) दुसरा कोणीहि ( न अस्ति-जातः ) नाहीं व जो ( विश्वा भुवनानि ) सर्व भुवनांमध्यें (अविवेश) भरून राहिला आहे तो सर्वांचा खरा रक्षक आहे. तोच सर्व जीवांना सर्व पदार्थ देणारा आहे. ( ज्योतींषि ) सूर्य, अग्नि व वायु हेहि त्यानेंच केले आहेत व आपल्या सोळा कलांच्या योगानें सर्व विश्व तोच बनवितो. त्या परमेश्वराचीच मी भक्ति करतों व त्यालाच नमस्कार करतों.

**स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ॥**
**स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ ४ ॥**
साम. उ. प्र. ११।३ ॥

हे ईश्वरा! तूं ( इन्द्रः ) परम ऐश्वर्ययुक्त, (वृद्धश्रवाः) ज्ञानमय ( पूषा ) सर्वपोषक, ( विश्ववेदाः ) सर्वज्ञ, वेदांचा आधार, ( तार्क्ष्यः ) सर्वशक्तिमान्, दुःखें दूर करणारा, आनंद देणारा व ( बृहस्पतिः ) ज्ञानाचा स्वामीहि तूंच आहेस. (स्वस्ति ) म्हणून तूं आम्हांला सुख दे.

अभयं मित्रादभयममित्रादभयं ज्ञाताद-
भयं परोक्षात् ॥ अभयं नक्तमभयं दिवा
नः सर्वा आशा मम मित्रं भवन्तु ॥ ५ ॥

अथर्ववेद कां. १९।२।१५।६ ॥

हे परमात्मन्! मित्र व शत्रु, ज्ञात व अज्ञात पदार्थ या सर्वांपासून रात्रीं, दिवसा व सर्व दिशांमध्यें आम्हांला अभय असो. अर्थात् कोणापासूनहि आमचें अकल्याण न होवो.

शान्ता द्यौः शान्ता पृथिवी शान्तामिदमुर्व-
न्तरिक्षम् ॥ शान्ता उदन्वती रापः
शान्ता नःसन्त्वोषधीः ॥ ६ ॥ अथर्ववेद १९।१।९।१

हे परमेश्वरा! तुझ्या कृपेनें आकाश, पृथिवी, अंतरिक्ष, जल व औषधी हे सर्व पदार्थ आम्हांला सुख देणारे होवोत. याप्रमाणें त्या सच्चिदानंद, निराकार, निर्विकार, निराधार, निगमप्रद, सर्वाधार सर्वेश्वर, सर्वव्यापक सर्वान्तर्यामि, अजर, अमर, अज, नित्य, शुद्ध व पवित्र अशा सृष्टिकर्त्या परमेश्वराची प्रार्थना करून सर्व पुरुषार्थाला व धर्माला आधारभूत असणाऱ्या ब्रह्मचर्याविषयीं, पुढील पिढीला लाभ व्हावा म्हणून तात्पर्यरूपानें विवेचन करतो.

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरंगैस्तुष्टुवा ँ सस्तनूभिर्व्यशेमहि देवहितं यदायुः ॥ ७ ॥

वाज. सं. २५.२१

हे देव हो! आमच्या कानांवर नेहमी चांगल्या गोष्टी पडोत. हविर्द्रव्यानें संतुष्ट होणारे देव हो! निर्मळ असेल तेंच आमच्या दृष्टीस पडो. निश्चल इंद्रियांनीं व स्थिर शरीरांनीं तुमचें स्तवन करणाऱ्या आमच्या आयुष्याचा, हे देव हो ! तुमच्या संतोषप्रीत्यर्थ व्यय व्हावो.

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥ ८ ॥ चतुर्ष्वपि वेदेषु ।

त्या सविता देवाच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों. तो सविता देव आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो.

## प्रार्थना ३ री

ॐ ।। यो ब्रह्माणं विदधाति पूर्वम् । यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ।
तं ह देवमात्म-बुद्धिप्रकाशम् । मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ १ ॥
नमस्ते सते ते जगत्कारणाय । नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय ।
नमोऽद्वैततत्त्वाय मुक्तिप्रदाय । नमो ब्रह्मणे व्यापिने शाश्वताय । २ ॥
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यं । त्वमेकं जगत्पालकं स्वप्रकाशम् ।
त्वमेकं जगत्कर्तृपातृप्रहर्तृम् । त्वमेकं परं निश्चलं निर्विकल्पम् ॥ ३ ॥
भयानां भयं भीषणं भीषणानाम् । गतिः प्राणिनां पावनं पावनानाम् ।
महोच्चैः पदानां नियन्तृत्वमेकम् । परेषां परं रक्षणं रक्षणानाम् ॥ ४ ॥
वयं त्वां स्मरामो वयं त्वां भजामो । वयं त्वां जगत्साक्षिरूपं नमामः ।
सदेकं निधानं निरालम्बमीशम् । भवाम्भोधिपोतं शरण्यं व्रजामः ॥५॥

जो सगळ्याआधीं ब्रह्मदेवाला उत्पन्न करतो आणि त्याच्यासाठीं वेदांची ( ऋग्वेद यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद ) रचना करतो, त्या आत्मबुद्धीनें प्रकाशमान् असलेल्या त्या देवाला मी मुमुक्षु होऊन शरण ( आश्रयस्थान ) जातो. १

जगताला कारण असलेल्या हे सत्स्वरूप परमात्म्या, तुला नमस्कार असो. सगळ्या लोकांचें आश्रयाचें ठिकाण असलेल्या चित्स्वरूप परमात्म्या, तुला नमस्कार असो. हे मुक्ति देणाऱ्या अद्वैततत्त्वरूप परमात्म्या तुला नमस्कार असो. हे शाश्वत आणि सर्वव्यापी ब्रह्म, तुला नमस्कार असो. २

तूंच एक शरणागताला योग्य असें आश्रयाचें ठिकाण आहेस आणि तूंच एक पूजनीय, जगाचा पालक, आणि स्वयंप्रकाशित आहेस. तूंच एक जगाचा पालक, जगाचा कर्ता आणि जगाचा संहारकर्ता आहेस. तूंच एक निश्चल व निर्विकल्प आहेस ३

भीतीला भीति देणारा आणि भयंकरांत भयंकर, प्राण्यांची गति आणि पावनांना पावन ( शुद्ध ) करणारा तूं आहेस. अत्यंत उच्च पदाचें नियंत्रण ठेवणारा परात्पर आणि रक्षण करणाऱ्यांचेंही तूं रक्षण करणारा आहेस. ४

आम्ही तुझें स्मरण करतो. आम्ही तुझें भजन-पूजन करतों. आम्ही तुला जगत्साक्षी म्हणून नमस्कार करतों. एकमात्र सत्स्वरूप निरालंब आणि भवसागरांतून पैलतीराला नेणारी नौकाच असलेल्या ईश्वराला आम्ही शरण जातों. ५

## प्रार्थना ४ थी

१

**ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ॥**

तै आ १।३१।६.

चढाई करून ( शत्रूला ) जिंकणाऱ्या राजाधिराज वैश्रवणाला आम्ही नमस्कार करतों. तो मनोरथांचा राजा वैश्रवण माझ्या कामना पूर्ण करो. विश्रवसपुत्र महाराज कुबेराला नमस्कार असो.

२

**ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्यायी स्यात् । सार्वभौमः सार्वायुष आऽन्तादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति ॥**

ऐ ब्रा. ३९.१

सर्वांचें कल्याण असो. हा (आमचा पराक्रमी बंधु) साम्राज्य भौज्य ( भोगसमृद्धि) स्वाराज्य ( निर्भेळ सत्ता ) वैराज्य ( वैशिष्टयुक्त ), पारमेष्ठ्य राज्य ( प्रजापतीचें राज्य ), माहाराज्य आणि आधिपत्य यांनीं युक्त होऊन दिशांच्या अंतिम मर्यादेपर्यंत जावो. हा सार्वभौम आणि पूर्ण आयुष्याचा होऊन समुद्रवलयांकित पृथ्वीचा एकटाच पूर्णपणें अधिपति होवो.

३

**तदप्येष श्लोकोऽभिगीतो 'मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्याऽवसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद ' इति ।** ऐ. ब्रा. ३९.७

याविषयीं पुढील स्तुति प्रसिद्ध आहे--

' सर्व कामना पूर्ण करणाऱ्या अवीक्षितपुत्र मरुत्त राजाच्या वाड्यांत मरुत् देव वाढप्याचें काम करीत होते. सर्व देव त्याचे सभासद होते. '

४

## प्रार्थना ५ वी

**सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥**

सुखी जीवन सर्वांचें व्हावें तेंवि निरामय।
दिसो मंगल सर्वांसी नसो दुःख कुणासहि॥

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहितः सज्जनाः सन्तु निर्भयाः॥

योग्य काळीं वृष्टि तेवीं पृथ्वी धान्यसमृद्ध हो।
नसावा क्षोम देशीं या व्हावे सज्जन निर्भय॥

## भारतीय वारकरी प्रार्थना ६ वी. ज्ञानेश्वरींतील प्रार्थना.

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें॥ तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥ १॥ जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रति वाढो॥ भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचें॥ २॥ दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो॥ जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥ ३॥

## प्रार्थना ७ वी. संतांना वंदन चोखामेळा.

सप्रेम निवृत्ति आणि ज्ञानदेव। मुक्ताईचा भाव विठ्ठल चरणीं॥ १॥
सोपान सांवता गोरा कुंभार। नरहरी सोनार प्रेमभरीत॥ २॥
कबीर कमाल रोहिदास चांभार। आणीक अपार वैष्णवजन॥ ३॥
चोखा तयां पायीं घाली लोटांगण। वंदितों चरण प्रेमभावें॥ ४॥

## नाममहिमा एकनाथ

पशुपक्षी वनचरें। श्वानश्वापदादि सूकरें॥ १॥
पडतां नामघोष कानीं। पावन होती इये जनीं॥ २॥
चतुष्पाद आणि तरुवर। नामें उद्धार सर्वांसी॥ ३॥
उंच नीच नको याती। ब्राह्मणादि सर्व तरती॥ ४॥
एका जनार्दनीं अभेद। नामीं नाहीं भेदाभेद॥ ५॥

## श्रीज्ञानदेव महाराज

रूप पाहतां लोचनीं। सुख झालें वो साजणी॥ १॥ तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा॥ २॥ बहुता सुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठलीं आवडी॥ ३॥ सर्व सुखाचें आगर। बाप रखुमादेवीवर॥ ४॥

## श्रीतुकाराम महाराज

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया॥ १॥

तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकर कुंडलें तळपतीं श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्वसुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

## श्रीनामदेव महाराज

वैकुंठी पाहे तंव चतुर्भुज दिसे । परि सुंदर रूप तेथ नाहीं ॥ १ ॥
क्षीरसागरीं पाहे तों तेथ निद्रिस्त । परि सुंदर रूप तेथें नाहीं ॥ २ ॥
द्वारकें पाहे तंव पाताळीं चरण । परि सुंदर रूप तेथें नाहीं ॥ ३ ॥
हृदयीं पाहे तंव अव्यक्तचि दिसे । परि सुंदर रूप तेथें नाहीं ॥ ४ ॥
नामा म्हणे ऐसा सर्वगुणसंपन्न । पंढरिये उभा शोभतसे ॥ ५ ॥

## श्रीएकनाथ महाराज

भीष्में जया ध्याइलें । तें विटेवरी देखिलें ॥ १ ॥ धर्मरायें पूजियलें तें विटेवरी देखिलें ॥ २ ॥ शिशुपाळा अंतक जाहलें । तें विटेवरी देखिलें ॥ ३ ॥ एका जनार्दनीं पूजिलें । तें विटेवरी देखिलें ॥ ४ ॥

जें द्रौपदीनें स्मरिलें । तें विटेवरी शोभलें ॥ १ ॥ जें अर्जुनें स्मरिलें । तें विटेवरी शोभलें ॥ २ ॥ जेणें गजेंद्रा उद्धरिलें । तें विटेवरी शोभलें ॥ ३ ॥ जें हनुमंतें स्मरिलें । तें विटेवरी शोभलें ॥ ४ ॥ जें पुंडलिकें ध्याईलें । तें एका जनार्दनीं देखिलें ॥ ५ ॥

## नृसिंह प्रार्थना. ॐ नारसिंहाय नमः ।

नाम नारसिंह नाम नारसिंह । भक्तासी तो सम सर्वकाळ ॥
जपे तो प्रल्हाद आवडीतें नाम । पावला सर्वोत्तम तयालागीं ॥
जनार्दनाच्या एका रूपातें पाहोनी । नारसिंहचरणीं मिठी घाली ॥ १ ॥

श्रीएकनाथ महाराज

## श्रीरामदास प्रार्थना ८ वी

महाभक्त प्रल्हाद तो कष्टवीला । म्हणोनी तया कारणें सिंह झाला ॥
नव्हे ज्वाळ वीशाळ सन्नीध कोणी । नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ २ ॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षू नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ।
जय जय रघुवीर समर्थ । श्रीसमर्थ रामदास

## भारतीय जैन धर्माची प्रार्थना

ॐ

**नमोऽत्थु णं समणस्स भगवओ महावीरस्स ।**

**पंच नमोक्कारा ।**

**नमो अरिहंताणं । नमो सिद्धाणं ।**
**नमो आयरियाणं । नमो उवज्झायाणं ।**
**नमो लोए सव्वसाहूणं ॥ १ ॥**
**एसो पंचनमुक्कारो सव्वपावप्पणासणो ।**
**मंगलाणं च सव्वेसिं पढमं होइ मंगलं ॥ २ ॥**

**चत्तारिमंगलं ।**

**अरिहंता मंगलं । सिद्धा मंगलं । साहू मंगलं ।**
**केवलि-पण्णत्तो धम्मो मंगलं ॥ ३ ॥**

**चत्तारिसरणं ।**

**अरिहंते सरणं पवज्जामि । सिद्धे सरणं पवज्जामि ।**
**साहू सरणं पवज्जामि । केवलिपन्नत्तं धम्मं सरणं पवज्जामि ॥४॥**

ॐ

श्रमण भगवान् महावीराला नमस्कार असो.

### पाच नमस्कार

अरिहंत देवांना माझा नमस्कार असो; ज्ञानी होऊन राग ( प्रेम ), द्वेष ह्या अरींचा म्हणजे शत्रूंचा नाश ( हंता ) करतात अशा वीतरागी तीर्थंकर देवांना माझा नमस्कार असो. सिद्ध देवांना माझा नमस्कार असो. आचार्य महाराजांना माझा नमस्कार असो. उपाध्यायजी महाराजांना माझा नमस्कार असो. सर्व साधु महाराज व साध्वीजी महाराज यांना माझा नमस्कार असो. १

वर सांगितलेल्या पांच परमेष्ठी देवांना केलेला नमस्कार सर्व पापांचा नाश करणारा आहे. ऐहिक व पारलौकिक सत्र मंगलांत पहिल्या दर्जाचें ( उत्कृष्ट सर्वश्रेष्ठ ) मंगल ( कल्याण करणारें ) आहे. २

### चार मंगल

अरिहंत, सिद्ध, साधू, केवलप्रणीत धर्म, मंगल होय. ३

## चार शरण

मी अरिहंतांना शरण जातों. मी सिद्धांना शरण जातों. मी साधूंना शरण जातों. मी केवलप्रणीत धर्माला शरण जातों. ४

## महव्वय उच्चारणा । महाव्रतांचा उच्चार

**१. सव्वाओ पाणाइवायाओ वेरमणं । २ सव्वाओ मुसावायाओ वेरमणं । ३. सव्वाओ अदिन्नादाणाओ वेरमणं । ४. सव्वाओ मेहुणाओ वेरमणं । ५. सव्वाओ परिग्गहाओ वेरमणं । ६. सव्वाओ राइभोअणाओ वेरमणं । समणसुत्तं**

सर्व प्रकारच्या प्राणघात कर्म करण्यापासून म्हणजे जीवहत्या, मनुष्यहत्या स्वतः करणें, दुसऱ्याकडून जीवहत्या, खून करविणें, खून करणाऱ्यास प्रोत्साहन देणें या पापकर्मापासून थांबणें. सर्व प्रकारच्या खोटें बोलण्याच्या प्रकारापासून म्हणजे चाहडी करणें, टाकून बोलणें, कठोर बोलणें, या पापापासून थांबणें. सर्व प्रकारच्या चोरीपासून म्हणजे धनधान्य, वस्त्रादि लहानसहान वस्तूंच्या चोरीपासून, वाङमयचोरीपासून अलिप्त राहणें. सर्व प्रकारच्या मैथुनप्रकारापासून, पुरुषानें परस्त्रीगमन, स्त्रीनें परपुरुषगमन करणें, यापासून अलिप्त राहणें. परिग्रह धनधान्य, घरदार, वस्त्रप्रावरण यांचा प्रमाणाबाहेर सांठा न करणें व रात्री भोजन यापासून अलिप्त राहणें.

## भारतीय जैनांची प्रार्थना

**अरिहंत नमो भगवन्त नमो**
**परमेश्वर जिनराज नमो**
**प्रथम जिनेश्वर प्रेम पेखत**
**सिद्ध सघला काज नमो ॥ १ ॥**
**प्रभु पारंगत परम महोदय**
**अविनाशी अकलंक नमो**
**अजर अमर अद्‌भुत अतिशय निधि**
**प्रवचन जलधि मयंक नमो ॥ २ ॥**
**सिद्ध बुद्ध तूं जगज्जन सज्जन**
**नयनानन्दन देव नमो**
**सकल सुरासुर नरवरनायक**
**सारे अहो निश सेव नमो ॥ ३ ॥**

तूं तीर्थंकर सुखकर साहिब
तूं निःकारण बन्धु नमो
शरणागत भविने हितवत्सल
तुंही कृपारस सिन्धु नमो ॥ ४ ॥
केवल ज्ञानादर्श दर्शित
लोकालोकस्वभाव नमो ।
नाशित सकल कलंक कलुषगण
दुरित उपद्रव भाव नमो ॥ ५ ॥
जगचिंताभणी जगगुरु जगहित
कारक जगजननाथ नमो ।
घोर अपार भवोदधि तारण
तूं शिवपुरणो साथ नमो ॥ ६ ॥
अशरण शरण निराग निरंजन
निरुपाधिक जगदीश नमो ।
बोध दीनुं अनुपम दानेसर
ज्ञान विमल सूरीश नमो ॥ ७ ॥

## भारतीय बौद्ध धर्माची प्रार्थना

ॐ नमो बुद्धाय ।

### बुद्ध वंदना ॥

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा संबुद्धस्स ।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा संबुद्धस्स ।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा संबुद्धस्स ।

### सरणत्तयं ।

बुद्धं सरणं गच्छामि । धम्मं सरणं गच्छामि । संघं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि बुद्धं सरणं गच्छामि । दुतियम्पि धम्मं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि संघं सरणं गच्छामि । ततियम्पि बुद्धं सरणं गच्छामि ।
ततियम्पि धम्मं सरण गच्छामि । ततियम्पि संघं सरणं गच्छामि ।

## पंचसीलानि । पञ्चशीलस्वीकार

१ पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि ।
२ अदिन्नादाना वेरमणी सिक्खापदं समादियामि ।
३ कामेसु मिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामि ।
४ मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामि ।
५ सुरामेरयमज्जपमादट्ठाना वेरमणी सिक्खापद समादियामि ।

## बुद्धवंदन

संपूर्ण ज्ञानी, जीवन्मुक्त अशा भगवान् बुद्धाला माझा नमस्कार असो. ज्यानें राग, द्वेष, मोह, शरीर-वाणी-मन-यांच्याद्वारें पा कर्मे करणें या गोष्टी भग्न म्हणजे नाश केल्या आहेत अशा भगवानाला आणि पापें करण्यास ज्याला रह म्हणजे एकांत नाहीं अशा अरहताला, ज्ञानरूपी तलवारीनें जन्म-मृत्युरूप संसार चक्राचे आरे मोडले आहेत अशा अरहताला, चांगल्या रीतीनें सर्व धर्मांचा बोध झाल्यामुळें ज्याला सम्यक् संबुद्ध म्हणतात अशा बुद्धाला, माझा नमस्कार असो.

## तीन शरणं. बुद्ध-धर्म-संघ-यांचा आधार घेणें.

मी बुद्धाला शरण जातों ( जातें ). मी धर्माला शरण जातों ( जातें ). मी संघाला शरण जातों ( जातें ). मी दुसऱ्यांदाही बुद्धाला शरण जातों ( जातें ). मी दुसऱ्यांदाही धर्माला शरण जातों ( जातें ). मी दुसऱ्यांदाही संघाला शरण जातों ( जातें ). मी तिसऱ्यांदाही बुद्धाला शरण जातों ( जातें ) मी तिसऱ्यांदाही धर्माला शरण जातों ( जातें ). मी तिसऱ्यांद ही संघाला शरण जातों ( जातें. )

## पांच शीलांचा स्वीकार

१. प्राणघात करण्यापासून अलिप्त राहण्याचें व्रत मी घेतों ( घेतें ).

२. चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याचें व्रत मी घेतों ( घेतें ).

३. व्यभिचारापासून अलिप्त राहण्याचें व्रत मी घेतों ( घेतें ).

४. खोटें बोलण्यापासून अलिप्त राहण्याचें व्रत मी घेतों ( घेतें ).

५. दारू पिणें, मादक पदार्थांच्या ( भांग, नीरा ) सेवनापासून अलिप्त राहण्याचें व्रत मी घेतों ( घेतें ).

अनुक्रम ३८३४४ दि. ७/२/४५
क्रमांक ...१९०८ ता. दि. १६-३-४५

शरीराच्या द्वारें कोणतींही पापें न करणें ही प्रतिज्ञा घेणें. स्वार्थासाठीं दुसऱ्यांचा खून करणें, दुसऱ्याकडून करविणें व खून करणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देणें या गोष्टी प्राणघातांत येतात; त्या न करणें. तसेंच चोरी करणें, चोरी करविणें, व चोरी करणाऱ्यांना प्रोत्साहन देणें या चोरीच्या पापापासून अलिप्त राहणें. पुरुषानें परस्त्रीगमन करणें, बाईनें परपुरुषगमन करणें हें व्यभिचारकृत्य करविणें व करणाऱ्यास प्रोत्साहन देणें यापासून अलिप्त राहणें. वाणीनें पाप करणें म्हणजे खोटें बोलणें, चाहडी, कठोर बोलणें, या पापापासून अलिप्त राहणें. दारू पिण्याच्या व्यसनामुळें माणसाचा सर्वस्वी घात होतो म्हणून दारू न पिणें.

**खून चोरी व्यभिचार खोटी वाणी तैसे मद्य ।**
**सोडा तुम्ही रात्रंदिन शुद्ध व्हाल साक्षी बुद्ध ॥** बुद्धअभंग-तुंगारकृत

## भारतीय शीखांची प्रार्थना

**एक ओं सतनाम कर्तापुरुष निर्भउ निर्वैर ।**
**अकाल भूरत अजूनी सैभं गुरुप्रसाद जप ।**
**आदि सच जुगादि सच है भी सच ।**
**नानक होसी भी सच ॥ वाह गुरू ।**

## पारशांची प्रार्थना ( अवेस्ता अहुनवइति गाथा । हा २८ )

**यानीम् मनो यानीम् वचो यानीम् श्यओथ्नॅम् । अषओनो**
**ज़रथुश्त्रहे । फ्रा अमेषा स्पेन्ता गाथाओ गेउर्वइन् । नेमो**
**वे गाथाओ अषओनीश् ॥०॥**
**अह्या यासा नेमङ्हा । उस्तान-ज़स्तो रफेध्रह्या । मइन्येउश्**
**मज्दाओ पओउर्वीम् । स्पेंतह्या अषा विस्पेंग श्यओथना ।**

**वङ्हेउश् ख्रतूम् मनङ्हो । या क्षनेवीषा गेउश्चा उर्वानेम् ॥ १ ॥**

**या श्यओथनाँम हाइतीम् यज़मइदे ।**
**अहुनवइतीम् गाथाँम् अषओनीम् अषहे रतूम् यज्मइदे ।**
**अहुनवइतियाओ गाथयाओ हन्दाता यज्मइदे ।**

**येङ्हे हाताँम् आअत् येस्ने पइती वङ्हो ।**
**मज़दाओ अहुरो वएथा अषात् हचा ।**
**या ओङ्हाँमूचा ताँस्चा ताओस्चा यज्मइदे ॥ २ ॥**

**( हा ३४, यस्न )**

ताँस् चा या ताओस्चा यज्मइदे ।
नॅमस्चा या आर्मइतीश् ईज़ाचा ।
नॅमस्चा या आर्मइतीश् ईज़ाचा ।
नॅमस्चा या आर्मइतीश् ईज़ाचा ।
अषेम् वोहू वहिश्तॅम् अस्ती ।
उश्ता अस्ती उश्ता अह्माइ ।
ह्यत् अषाइ वहिश्ताइ अषेम् ॥ ३ ॥
हा ५९ यस्न ( सॅबार )

पुण्यात्मा जरतुष्ट्राचें कर्म, विचार आणि वचन धन्य होत. पवित्र आत्म्यानें धर्मग्रंथ प्रगट केले. हे दिव्य धर्मग्रंथ ! तुमचें आम्हीं स्तवन करतों.

हे मज्द ! तुमची अर्चना करीत असतां आम्ही तुमच्या कृपाप्राप्तीची इच्छा करतों आणि तुमच्यापुढें हात पसरीत तुमच्या दानशील आत्म्याच्या प्रसादासाठीं प्रार्थना करतों. आम्ही अत्यन्त नम्रपणें विनंती करतों कीं सर्वांसाठीं आमचीं कर्में सत्य भावनेनें घडोत.

तुमचें औदार्य समजण्यासाठीं आम्ही हात जोडून तुम्हांला प्रार्थना करतो.

परमपवित्र अशा अहुनावदगाथेचें आणि अहुनावद गाथेच्या प्रार्थनेचें आम्ही श्रद्धापूर्वक स्मरण करतों.

पावित्र्याची अधिष्ठात्री देवता अशा अहुनावद गाथाची आम्ही उपासना करतों. अहुनावद-गाथेच्या प्रार्थनेची आम्ही अर्चना करतों. अहुरमज्दनें ( ईश्वरानें ) पावित्र्याच्या द्वारें उपासनेंत ज्यांना श्रेष्ठ गणलें आहे त्या नरनारींचें आम्ही स्तवन करतों. पवित्रता ही सर्वोत्तम वस्तु आहे. पवित्रतेसाठीं जो पवित्र रहातो त्यालाच आनंद होतो.

## ख्रिस्त्यांची प्रार्थना

Almighty God, unto whom all hearts be open, all desires known, and from whom no secrets are hid; cleans the thoughts of our hearts by the inspiration of the holy Spirit, that we may perfectly love thee and worthily magnify the Holy Name. Through, Christ our Lord—Amen.

O Lord Christ ! We the faithful sold iers dedicate this new-born day to Thee, praying that it may shine on Thy service as a pure pearl in the chaplet of our

life, O Thou great King of Love, to whom be praise and adoration for ever more — Amen.

Teach us, O Lord ! To see Thy life in all men and in all the peoples of thine earth and guide our nation through its leaders to preserve Thy peace, that menace of war be far from our days. Through Christ our Lord. — Amen.

To the most Holy and Adorable trinity Father, Son and Holy Spirit. Three persons in one God; to Christ our Lord, the only wise counseller, the Prince of Peace, to the Seven Mighty Spirits before the Throne and to the glorious Assembly of first men made perfect, the Watchers, the Saints, the Holy Ones, be praise unceasing from every living creature, and honour, might and glory, henceforth and for evermore. —Amen.

The peace of God which passeth all understanding, keep your hearts and minds in the knowledge and love of God, and of his Son Christ our Lord; and the blessing of God, Almighty, the Father, the Son, and the Holy Ghost be amongst you, and remain with you always. — Amen.

सर्वांचीं हृदयें पाहणारा, सर्वांची अभिलाषा जाणणारा आणि ज्याच्यापुढें कसलीही गुप्तता राहूं शकत नाहीं असा सर्वशक्तिमान् प्रभु आपल्या दिव्य आत्म्याच्या प्रेरणेनें आमच्या अंतःकरणांतील विचार शुद्ध करो आणि त्यामुळें आमचें प्रभूवर पूर्ण प्रेम बसून त्याच्या पवित्र नामाचा महिमा यथार्थपणें वाढो. प्रभू येशूकडून. आमीन. हे प्रभू येशू ! तुमचे आम्ही भक्तसैनिक हा नवोदित दिवस आम्ही तुम्हांला अर्पण करतो आणि प्रार्थना करतो कीं, तो आमच्या जीवनरूपी माळेंत शुद्ध मोत्यासारखा तुमच्या सेवेंत चकाको. हे प्रेमाधिराज ! तुमचें स्तवन आणि उपासना सदासर्वदा घडत राहो ! आमीन. हे प्रभो ! सर्व मानवांत आणि पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत तुमचें जीवन पहाण्याचें आम्हांला शिक्षण दे आणि भीषण युद्धापासून आम्ही दूर रहावें म्हणून राष्ट्राची शांतता राष्ट्रनेत्याकडून कायम टिकविण्याची प्रेरणा कर. आमच्या प्रभु येशूकडून

काव्य७६०९

-आमेन पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्या त्रिविध ईश्वरी रूपाचें, शांतीचा राजकुमार, ज्ञानी, उपदेष्टा प्रभू येशूचें प्रभूच्या सिंहासनाजवळ असलेल्या स्रोत शक्तिमान आत्म्यांचें, रक्षकांचें, संतांचें नि महात्म्यांचें सदासर्वदा प्रत्येक प्राण्याकडून स्तवन होवो

आमीन

अचिंत्य ईश्वरी शांति तुमच्या हृदयाला नि मनाला ईश्वर आणि ईश्वरपुत्र येशूच्या ज्ञानप्रेमांत रत होवो. आणि सर्वशक्तिमान् परमपिता ईश्वर, पुत्र ( येशू ) व दिव्य आत्मा यांची कृपा तुमच्यावर असो आणि ते सदैव तुमच्या पाठीशीं राहोत.

आमीन

REFBK-0013477
REFBK-0013477

## मुसलमानांची प्रार्थना

**[illegible]स्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम ।**
**अल्हम्दो लिल्लाहे रब्बिल आल्मीन ।**
**अर्रहमा निर्रहीम । मालिके यौमुद्दीन ।**
**इय्याका ना ' बदो व इय्याका नस्त ' ईन् ।**
**इह्देनस सिरातल मुस्तकीम । सिरातल्लजीना**
**अन अम्त अलैहिम गैरिल मग्दूबे अलैहिम**
**वलज्जालीन । आमीन्**

दयाळू, करुणामय प्रभूच्या नांवाचा विजय असो. तो दयाळू भगवान धर्म दिवसाचा अधिपति आहे. तो ज्ञानमय आहे आणि शक्तिमानही आहे. तुझ्या ठिकाणीं रमण करणाऱ्यांचा जो मार्ग आहे त्या सन्मार्गांत तूं आमचा मार्गदर्शक हो. तुला न मानणाऱ्या नि अधर्माचरण करणाऱ्यांचा हा मार्ग नव्हे.

## संत सुकन्या " रबिया " हिची ईश्वरप्रार्थना

" हे परमेश्वरा, तूं माझ्यासाठीं ह्या जगांत जें जें कांहीं नक्की करावयाचें ठरविलें असशील तर तें सर्व माझ्या बांधवांना दे. मला तूं तेवढा बस्स आहेस. तुझ्याशिवाय मला दुसरें कांहीं नको. ईश्वरा ! जर मी नरकाच्या भीतीनें तुझी पूजा करीत असेन तर मला नरकाच्या आगींत जाळून भस्म कर ! जर स्वर्गाच्या लोभानें मी तुझी सेवा करीत असेन तर तो स्वर्ग सुद्धां मला बहिष्कृत करो, पण जर का मी केवळ तुझ्यासाठीं तुझी पूजा करीत असेन तर मात्र तुझ्या उज्ज्व सौंदर्यदर्शनापासून मला वंचित करूं नकोस ! "

" हे सख्या, जोंपर्यंत तूं सर्व पतितांचे हात धरून त्यांना जवळ घेणा नाहींस तोंपर्यंत तूं माझा हात धरूं नकोस ! जोंपर्यंत तूं सर्व दुःखितांचे अश्रू

पुसणार नाहींस तोंपर्यंत तूं माझ्या डोळ्यांतल्या आसवांकडे ढुंकूनही बघूं नकोस. जोंपर्यंत तूं सर्वांच्या हृदयाचें सिंचन केलें नाहींस, तोंपर्यंत माझें हृदयसुद्धां वाळवंटच राहील. त्यासाठीं करुणेची आवश्यकता मुळींच नाहीं. "

"हे प्रभो ! हे पतित वर येणार नाहींत कां ! अश्रूंनीं भिजलेल्या ह्या बंधुभगिनींना शांति मिळणारच नाहीं काय ! माझ्या ह्या दुःखीकष्टी जिवलगांच्या जीवनांत नवें चैतन्य उत्पन्न होणार नाहीं काय ? मला तूं तरी आहेस पण या विचाऱ्यांना आधार कोणाचा ? "

"मला उंचच उंच असें गगनचुंबी पर्वतशिखर न बनवतां हे प्रभू, तूं मला सपाट असें फलद्रूप शतच बनीव, म्हणजे त्यामुळें भुकेलेल्या लोकांना माझ्याद्वारें अन्न मिळेल. मला विशाल असा अथांग खारट समुद्र न बनवतां हे प्रभु, सपाट जमिनीवरून वाहणारा लहानसा झराच बनीव कीं ज्यामुळें तहानेले माणसें माझ्यांतून पाणी पितील. मला वीराच्या हातांतली तळपणारी तलवार न बनवतां हे प्रभू, मला एकादी सामान्य काठीच बनीव, कीं ज्यायोगें पतित आणि दुर्बल माणसें माझा आधार घेऊन चालू शकतील. "

## संत रबियाची कहाणी

इ. स. १२०० मध्यें तुर्कस्तान 'बसरा' येथील एका गरीब मुसलमानाची 'रबिया' ही मुलगी. अरबी भाषेंत 'राबअ' म्हणजे 'चौथा'. बापाची ही 'चौथी मुलगी' म्हणून आईबापांनीं तिचें 'रबिया' नांव ठेवलें. लहानपणींच आईबापांचा मृत्यु. भयंकर दुष्काळाच्या कालांत एका दुष्ट मनुष्यानें हिला पकडून थोड्या पैशांत एका अमिराला विकलें. दासी म्हणून अमिराच्या घरीं रावत असतां त्या निर्दय अमिराकडून तिला पुष्कळ छळ सोसावा लागला, हातही मोडला गेला. अखेर रबियाच्या आत्मतेजानें दिपून तिला अमिरानें दास्यमुक्त केलें. वाचकांना रबियाचें त्यागी व तापसी जीवन फारच बोधप्रद होईल, यांत शंका नाहीं. ( भक्तनारी, गीताप्रेस, गोरखपूर. )

## वन्दे मातरम् ।

वंदे मातरम् । सुजलां सुफलां मलयजशीतलाम् । सस्यश्यामलां मातरम् । वंदे० ।। शुभ्रज्योत्स्ना-पुलकित-यामिनीम् । फुल्लकुसुमित-द्रुमदलशोभिनीम् । सुहासिनीम् सुमधुर-भाषिणीम् । सुखदाम् वरदाम् मातरम् । वन्दे मातरम् । ( बंकिमचंद्रकृत )

प्रकाशक—पंडित नारायण वासुदेव, तुंगार, ४०८ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रक—भ. पं. सोमण, मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, ३९१ नारायण पेठ, पुणें २.

## पंडित नारायण वासुदेव तुंगार, यांचीं पुस्तकें
## प्रसिद्धीच्या वाटेवर

१. **संतांचें विचारसौंदर्य**-ज्ञानेश्वर, निवृत्ति, तुकाराम, नामदेव, एकनाथ, जनाबाई, मुक्ताबाई, सोपान, सांवता माळी, गोरा कुंभार, सेना, चोखा मेळा, मिराबाई, तुलसीदास, कबीर, यांच्या नीतिपर, उपदेशपर, सुबोध, मनाला शांति देणाऱ्या, उत्तम अभंगांचा संग्रह. सचित्र पुस्तक. डेमी साईज.

२. **युद्धविजयी प्रार्थना**—भारतीय युद्धशास्त्र, शिक्षण, युद्धमहत्त्व, यांवरील वैदिक, जैन, बौद्ध, शीख, वाङ्मयांतलि युद्धप्रोत्साहनपर उत्कृष्ट प्रार्थना यांचा संग्रह असलेलें सचित्र पुस्तक. डेमी साईज.

३. **राष्ट्राचे मानबिंदु**—राष्ट्रभक्ति, देवभक्ति, नित्याचारांत सत्यता, स्त्रीवर्गांचें सर्वांगीण पावित्र्य राखणें, या चार राष्ट्रमानबिंदूंचें महत्त्व पटवून देणारें सचित्र पुस्तक. डेमी साईज.

## विक्रीस तयार

**अशोकाचा राजधर्म**-भारताच्या अशोक राजचिन्हाची माहिती, अशोकाच्या चौदा शिलालेखांवरील प्रजेला सांगितलेला धर्म. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण, शेतकी, तुरुंग, स्कूल बोर्ड, महानगरपालिका, यांनीं पुरस्कारिलेलें पुस्तक. डेमी साईज, पृष्ठें ५२, किंमत ७५ नवे पैसे.

**महाराष्ट्रवन्दनम्**—लघुकाव्य. ४२ श्लोक. मूळ संस्कृत व त्याचा मराठी पद्यानुवाद. महाराष्ट्र सरकारचें शिक्षणखातें, समाजकल्याणखातें, शेतकी खातें, पशुसंवर्धन खातें, तुरुंगखातें, यांनीं आपल्या शिक्षणसंस्थांच्या वाचनालयांसाठीं प्रती घेऊन प्रोत्साहन दिलें आहे. त्याचप्रमाणें शेकडो खाजगी प्राथमिक शाळा, हायस्कुलें, ट्रेनिंग कॉलेजें, इतर सर्व प्रकारचीं कॉलेजें, यांनीं प्रती घेऊन प्रोत्साहन दिलें आहे. रोजच्या प्रार्थनेसाठीं या काव्यांतील १ ते १५ श्लोक म्हणण्याचा अनेक शिक्षणसंस्थांनीं स्तुत्य उपक्रम केला आहे. १५ ऑगस्ट-स्वातंत्र्य दिन, २६ जानेवारी-प्रजासत्ताक दिन, १ मे-महाराष्ट्र राज्य स्थापना दिन, थोरांच्या जयंत्या, या शुभ प्रसंगींही प्रार्थनेकरितां या लघुकाव्याचा उपयोग जनता करीत आहे. $\frac{1}{8}$ डेमी साईज, पृष्ठें १२, सचित्र. किं. २५ नये पैसे. उत्तम कव्हर.